# JD Audit, Academic year 2012-13 to 2016-17

# Accounting Officer, JD. Office, Aurangabad.

जा.क्र.वलेप/उशि/औवि/वलेप/२०१८/ 173/75
कार्यालय, लेखाअधिकारी , (उशि)
औरंगाबाद विभाग औरंगाबाद.
दिनांक :- 31/05/2018

प्रति,
मा.प्राचार्य,
कालाकादेवी महाविद्यालय शिरुर कासार,
जि. बीड.

विषय :- सन (२०१२-१३ ते २०१६-१७ ) चे लेखा परिक्षण/निरिक्षण अहवाल

महोदय,

आपल्या महाविद्यालयाचे सन (२०१२-१३ ते २०१६-१७ ) या वर्षाचे निरिक्षण /लेखा परिक्षणाचा अहवाल सोबत पाठविला आहे.

आक्षेपाप्रमाणे अनुपालन कार्यवाही पूर्ण करुन तीस (३०) दिवसामध्ये आपला अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे.

कृपया या पत्राची पोहोच द्यावी.

लेखाअधिकारी तथा वरीष्ठ लेखा परिक्षक
उच्च शिक्षण अनुदान
औरंगाबाद.

प्रतिलिपी : - १) सहायक संचालक (लेखा) शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण ) म.रा.पुणे :-१ यांना सविनय सादर.

२) मा.सहसंचालक (उच्च शिक्षण),औरंगाबाद विभाग,औरंगाबाद यांना सोबतच्या लेखा परिक्षण अहवालात दर्शविल्याप्रमाणे वसूलीची रक्कम (रिकव्हरी)या पुढे देय होणा-या वेतन/वेतनेत्तर अनुदानातून वसूल करुन तसा अहवाल कार्यालयास पाठवावा,हि विनंती.

लेखाअधिकारी तथा वरीष्ठ लेखा परिक्षक
उच्च शिक्षण अनुदान
औरंगाबाद.

**महाविद्यालय :- कालिकादेवी महाविद्यालय शिरुर कासार जि. बीड.**

**लेखा परीक्षण अहवाल सन :** सन २०१२-१३ ते २०१६-१७

**कालिकादेवी महाविद्यालय शिरुर कासार , जि. बीड.** यांचे लेखा परीक्षण लेखा अधिकारी ,उच्च शिक्षण औरंगाबाद यांनी महाविद्यालयाने उपलब्ध केलेल्या अभिलेख्यावरुन केले व अहवाल बाबतची चर्चा प्राचार्य यांचेशी केली.

मा.सहसंचालक, उच्चशिक्षण,औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांचे सन २०१२-१३ ते २०१६-१७ पर्यंतचा अनुदान निर्धारण अहवाल या कार्यालयास प्राप्त झालेले नाहीत. सन २०१२-१३ ते २०१६-१७ पर्यंतचे अहवाल अनुपालनास सादर करावेत.

**भाग :-१ ) मागिल लेखा परिक्षण अहवाल ,**
**प्रलंबित लेखा आक्षेपाचे अनुपालन त्वरीत सादर करावे.**
**भाग : - २) चालु लेखा परीक्षण**

महाविद्यालयाचे प्राचार्य खालील प्रमाणे अधिकार पदावर कार्यरत होते.

| अ. क्र | प्राचा-र्यांचे नाव | कालावधी |
|---|---|---|
| १ | प्रा. डॉ. एच. बी. रणखांब | दि. २७.०५.२००९ ते ३१.०५.२०१४. |
| २ | प्रा. डॉ. एस. के. तुपे | दि. ०१.०६.२०१४ ते ०८.१२.२०१४. |
| ३ | प्रा. डॉ. पी. बी. देशमाने | दि. ०९.१२.२०१४ ते आजपर्यंत. |

**परि. क्र.- १ वेतन व वेतनेत्तर अनुदान**

१.महाविद्यालयास खालील प्रमाणे वेतन व वेतनेत्तर अनुदान मिळाल्याचे सादर केलेल्या लेख्यावरुन व सनदी लेखा परीक्षकांचे अहवालावरून दिसुन आले. परंतु कोणत्या आदेशान्वये प्राप्त झाले या बाबतचा पत्रव्यवहार / आदेश तपासणीस प्राप्त झाले नाही तरी पुढील लेखा परीक्षणात अनुपालन सादर करुन पुर्तता दर्शवावी.

| वर्ष | वेतन अनुदान | शैक्षणिक शुल्क | प्रत्यक्ष वेतन खर्च | शिल्लक अनुदान |
|---|---|---|---|---|
| २०११-१२ | - | - | - | १२२०१६३/- |
| २०१२-१३ | २०००९८१९/- | ३३९२००/- | १९९६३८२०/- | ३८५१९९/- |
| २०१३-१४ | २४९११६९६/- | ५१६४००/- | २५२४४२४०/- | २६३८५६/- |
| २०१४-१५ | २४५६७०२२/- | ६५६००/- | २४६०२२५४/- | ३०३६८/- |
| २०१५-१६ | ३८३५३७४३/- | ४१५४८०/- | ३८२६४३३१/- | ५०४८९२/- |
| २०१६-१७ | ३१७७७७६८/- | ३७५०९०/- | ३१५४३३१८/- | ६०९५४०/- |
| एकूण | १३९७०००४८/- | १७११७७०/- | १३९६१७९६३/- | ३०१४०१८/- |

३१ मार्च २०१७ अखेर वेतन खाती अनुदानातील शिल्लक रु. ३०१४०१८/- असून , शैक्षणिक शुल्लकातुन वेतनेत्तर अनुदानाचे समायोजन अनुदान निर्धारणाअंती करण्यात यावे.तदनंतर वेतन अनुदानाची मागणी निर्धारित शिल्लक वगळून करण्यात यावी.

**परि क्र ५ :- विनानिविदा खरेदी :-**

| अ. क्र | खरेदी वर्ष | खरेदीचा तपशिल | रक्कम |
|---|---|---|---|
| १ | २०१२-१३ | फर्निचर खरेदी | ८२०००/- |
| २ | २०१२-१३ | फर्निचर खरेदी | ८०३००/- |
| ३ | २०१३-१४ | फर्निचर खरेदी | १०२८००/- |
| ४ | २०१३-१४ | फर्निचर खरेदी | ६४८५०/- |
| ५ | २०१५-१६ | फर्निचर खरेदी | ४५०२५३/- |
| एकूण | | | ७८०२०३/- |

महाविद्यालयाने वरील प्रमाणे निविदेशिवाय खरेदी व इतर कामे केल्याने तुलनात्मक निम्नदराचा फायदा झालेला नाही. करीता वरील रक्कमेची खरेदी व इतर आक्षेपाधिन ठेवण्यात येते.

**परि क्र ६:- प्रमाणकाशिवाय खरेदी /खर्च :-**

लेखा परिक्षणास असे निदर्शनास आले आहे की, महाविद्यालयाने खालील प्रमाणे खरेदी केलेली आहे. खरेदीचे प्रमाणके लेखा परीक्षणास पाहावयास मिळालेले नाही.

| अ. क. | प्रमाणक क्र | दिनांक | रक्कम | तपशील |
|---|---|---|---|---|
| १ | १० | ०८.०४.२०१३ | २८३२५/- | संगणक दुरुस्ती |
| २ | १६५ | २९.०७.२०१३ | १६९१०/- | खेळ साहित्य खरेदी |
| ३ | १७४ | ०१.०८.२०१३ | ११०७९/- | स्टेशनरी खरेदी |
| ४ | ३८८ | ०१.०१२.२०१४ | ६०००/- | कार्यालयीन खर्च |
| ५ | १०१ | ०२.०७.२०१६ | ५००००/- | फर्निचर खरेदी |
| ६ | ७१५ | १५.०८.२०१७ | ८८६८/- | बायोमॅट्रिक यंत्र खरेदी |
| एकूण | | | १२११८२/- | |

वरील खर्च लेखापरीक्षणात अमान्य करण्यात येतो.

**परि क्र ०७ जाहीरात खर्चा बाबत :-**

| अ. क्र. | प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम | तपशिल |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| एकूण | | | | |

वरील खर्च लेखापरीक्षणात अमान्य ठेवण्यात येतो.

m/ [illegible]
[illegible]

**परि.क्र . :- २. सेवापुस्तीकेतील नोंदीस सक्षम प्राधिकारी यांची मान्यता नसणे बाबत.**

| अ. क्र | कर्मचा-याचे नाव | पदनाम | तपशिल | शेरा. |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. शेणकुडे बी. एस. | मुख्यलिपीक | सक्षम अधिकारी यांची मान्यता नाही. | |

**परि.क्र ३ :- सेवापुस्तीकेबाबत:-**

महाविद्यालयामध्ये शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचा-यांचे सेवापुस्तक आहेत. परंतु वेळोवेळी त्यात खालील प्रमाणे नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत.

१. काही कर्मचारी यांचे जन्म दिनांक मुळ प्रमाणपत्रावरुन प्रमाणित केलेले नाहीत.

२.नविन कर्मचारी रुजु झाल्यानंतर त्याची वैद्यकीय तपासणी जिल्हा शल्य चिकीस्तक यांचेकडून करणे आवश्यक आहे. परंतु महाविद्यालयाने कर्मचा-यांची वैद्यकीय तपासणी काही प्रकरणात केलेली नाही. .

४.कर्मचा-यांचे भविष्य निर्वाह निधी क्रमांक सेवा पुस्तकात नोंदविलेले नाहीत. व काही कर्मचा-यांचे विहीत नमुण्यात नामनिर्देशन घेतलेले नाही.

५ अर्जित रजा/अर्धवेतन रजा लेखा सेवा पुस्तकात वेळोवेळी अद्यावत केलेला नाही.

७.महाविद्यालयाने काही शिक्षकेत्तर कर्मचा-यांना महाराष्ट्र दर्शनाची सवलत दिलेली आहे. परंतु याची नोंद सेवा पुस्तकात घेतलेली नाही.

८.शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांची जात वैधता केल्याची नोंद घ्यावी.

**परि.क्रं.४ :- दरपत्रकाशिवाय खरेदी :-**

शासन निर्णय उद्योग व उर्जा विभाग मंत्रालय,मुंबई क्रमांक /१०८८/२५१२/उद्योग-६ दिनांक ०२.०१.१९९२ व १६.०७.१९९३, ३०.१०.२०१५व दि. ०१.१२.२०१६ नुसार रुपये १०००/- व ५०००/- वरील खरेदी दरपत्रका नुसार तुलनात्मक रित्या निम्नदराने करणे आवश्यक आहे. परंतु महाविद्यालयाने खालील वस्तु दरपत्रकाशिवाय खरेदी केलेल्या आहेत. महाविद्यालय स्तरावर खरेदीसाठी विहीत खरेदी समीती स्थापन केलेली नाही.

| अ. क्र. | प्र. क्र | दिनांक | रक्कम | तपशिल |
|---|---|---|---|---|
| १ | २२८४ | ०९.१००२०१२ | १८०६०/- | स्टेशनरी खरेदी |
| २ | ०३ | ०४.११.२०१२ | ५०००/- | संगणक खर्च |
| ३ | २२९ | ०८.०८.२०१२ | ७५००/- | वाटर पंप खरेदी |
| ४ | १९७ | २९.०७.२०१२ | ९२४००/- | वार्षिक अंक खरेदी |
| ५ | ११ | ०८.०४.२०१३ | ४६४७९/- | ईमारत दुरुस्ती. |
| ६ | ३६६ | ०३.१२.२०१३ | ५०००/- | हार्ड डीक्स खरेदी |
| ७ | १६९ | २७.०२.२०१३ | २७२५६/- | स्टेशनरी खरेदी |
| ८ | ०३ | ०२.०४.२०१४ | ८८००/- | इन्वर्टर खरेदी |
| ९ | ८९ | १२.०६.२०१४ | ३११८०/- | स्टेशनरी खरेदी |
| १० | ८६ | ०४.०६.२०१४ | ६७५००/- | वार्षिक अंक छपाई |
| ११ | २१८ | ०५.०८.२०१५ | २५२५०/- | स्टेशनरी खरेदी |
| १२ | ३५४ | ११.१०.२०१६ | ९७६०/- | प्रयोगशाळा साहित्य खरेदी |
| १२ | २४६ | ३१.०८.२०१६ | ८२३५०/- | प्रयोगशाळा साहित्य खरेदी |
| एकूण | | | ४२६५३५/- | |

रु४२६५३५/- चा झालेला खर्च लेखा परिक्षणात आक्षेपाधिन ठेवण्यात येतो. अनुपालन सादर करावे.

**परि.क्रं.११ :- नोदवहया न ठेवणे बाबत :-**

**महाविद्यालयाने खालील प्रमाणे नोंदवहया अदयावत ठेवलेल्या नाहीत.त्या ठेवून पुर्तता दर्शवावी.**

१. विद्युत मिटर नोंदवही
२.वेतनवाढ नोंदवही
३.दुरध्वनी नोंदवही
४.वृत्तपत्र नोंदवही
५.अग्रिम नोंदवही
६.सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-यांची नोंदवही
७.साठा नोंदवही
८.जड संग्रह नोदवही.

**परि. क्र. १२ :-** शासन निर्णय वित्त विभाग, दि. ३१.१०.२००५ नुसार दि. ०१.११.२००५ व त्यानंतर रुजु होणा-या कर्मचा-यांसाठी नविन परिभाषित अंशदायी सेवानिवृत्ती वेतन योजना ( DCPS ) लागू केलेली आहे. सदर योजनेतील सभासदांची नियमित अंशदानाची कपात सुरु झालेली नाही. अनुपालन दर्शवावे.

**परि. क्र. १३ :-** श्री. शेनकुडे एस. बी. यांना मुख्यलिपीक पदी पदोन्नत्ती देतांना संबधिताकडे लगतच्या वरिष्ट लिपीक पदावरील किमान तीन वर्षाचा अनुभव असणे या अटीची पुर्तता झालेली नाही. संबधित कनिष्ठ लिपीक पदावर काम करत होते. यावरुन सदरची पदोन्नत्ती ही उड्डाण पदोन्नत्ती ठरते. अशा पदोन्नत्तीस प्रमाणसंहीता १९८४ नुसार मान्यता देता येणार नाही. सदर पदोन्नत्ती आक्षेपित ठेवून अदा केलेले वेतन अमान्य करण्यात येते.

**परि. क्र. १४ :-**महाविद्यालयाने लेखा परिक्षण वर्षामध्ये इमारत भाडे प्रदान केलेले असुन, भाडेतत्वावरील ईमारत दुरुस्तीवर खालील प्रमाणे खर्च केलेला आहे. सदरचा खर्च लेखा परिक्षणात अमान्य करण्यात येतो.

| अ. क्र | वर्ष | रक्कम | खर्चाचे विवरण | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | २०१२-१३ | ९७६६४ | ईमारत दुरुस्ती | |
| २ | २०१३-१४ | ८४१८७ | ईमारत दुरुस्ती | |
| ३ | २०१४-१५ | ७६४६५ | ईमारत दुरुस्ती | |
| ४ | २०१५-१६ | ६१८७४९ | ईमारत दुरुस्ती | |
| | एकूण | ८७७०६५/- | | |

**परि. क्र. १५ :-** सन २०१६-१७ मध्ये महाविद्यालयाने विद्यापीठ परीक्षा शुल्कासाठी विद्यार्थ्यांकडून वसुल केलेली एकूण रक्कम रु. १३६०३१५/- असून यापेकी विद्यापीठास जमा केलेले शुल्क केवळ रु. १०३८८९०/- इतके आहे. रु. ३२१४२५/- इतकी रक्कम महाविद्यालयाकडे शिल्लक राहते. सदरची शिल्लकीचा खुलासा व्हावा, अतिरिक्त शुल्क वसुली केली असल्यास विद्यार्थ्यास परत करुन अनुपालन दर्शवावे.

**परि.क्रं. ८ - विविध वस्तु खरेदी व देयक रोख रक्कमेत अदाई बाबत. --------**

महाविद्यालयाने उक्त लेखा परिक्षण कालावधीत खरेदी केलेल्या वस्तु त्या खरेदी केल्यानंतर त्याची नोंद साठा/जड संग्रह नोंदवहीत घेतलेली नाही व रुपये ५००/- च्या वरील देयकाची अदाई रोख रक्कमेत केलेली आहे.रुपये ५००/- च्या वरील खरेदी रक्कमेची अदाई धनादेशाव्दारे करवयास पाहीजे परंतु महाविद्यालयाने यानुसार कार्यवाही न करता रोख रक्कमेत अदाई केलेली आहे. खुलासा व्हावा.

| अ. क्र | प्रमाणक क्र | दिंनाक | रक्कम | तपशिल |
|---|---|---|---|---|
| १ | ४६५ | ०७.०१२.२०१४ | १५४५/- | लाईट फिटींग दुरुस्ती |
| एकूण | | | १५४५/- | |

सदर खर्च लेखा परिक्षणात आक्षेपाधिन ठेवण्यात येते.

**परि क्र ०९ मानधन वाटपाबाबत :-** महाविद्यालयाने खलील प्रमाणे मानधन वाटप केलेले आहे.

| अ. क्र | दिनांक | प्रमाणक क्र | रक्कम | तपशिल |
|---|---|---|---|---|
| १ | २५.०७.२०१२ | - | २२१२५०/- | प्राध्यापकांची तासिका त्तवारील रक्कम वाटप |

पाहणी करीता Keep

रु. २२१२५०/- एवढे मानधन वाटप करण्यात आलेले आहे. परंतु सदर वाटपा बाबतचा तपशिल लेखा परिक्षणास प्राप्त न झाल्यामुळे, सदर रक्कम आक्षेपाधिन ठेवण्यात येते. अनुपालनसह पुर्तता दर्शवावी.

**परि क्रं.१० :- विविध वस्तु /फर्निचर /लेखन साहीत्य व पुस्तके व इतर साहित्य खरेदी बाबत.**

महाविद्यालयाने या कालावधीत विविध वस्तु फर्निचर व इतर लेखन साहित्य इ. खरेदी केलेली आहे.यावर खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

१. महाविद्यालयात खरेदी केलेले वाचनालयातील पुस्तके व जड संग्रह वस्तु यांची प्रत्यक्ष तपासणी प्रतीवर्ष ३० जुन रोजी करुन तसे प्रमाणपत्र प्राचार्य यांनी नोंदवहीत नोंदवयास पाहीजे. लेखा परिक्षणात केलेल्या मार्गदर्शनानूसार कार्यवाही करुन पुर्तता लेखा परिक्षणास सादर करावी.

२.आयकर नियम १९२ ते १९६ नुसार खरेदी केलेल्या वस्तु/सेवा यावरील देयकातुन TDS रुपात विहीत दराने आयकर कपात करणे आवश्यक आहे.परंतु उक्त लेखा परीक्षण कालावधीत महाविद्यालयाने खरेदी केलेल्या वस्तुंवर आयकर वसुल करुन शासन खाती भरलेला नाही ,खुलासा व्हावा व आयकर वसुल करुन शासन खाती भरणा करुन पुर्तता दर्शवावी.

३.महाविद्यालयाने रोख रक्कम /भाडांर / वाचनालय सांभाळणा-या कर्मचा-याकडुन महाराष्ट्र वित्तीय नियमावली नियम ५१ नुसार बंधपत्र घ्यावयास पाहिजे व ते दरवर्षी प्रमाणित करुन घ्यावयास पाहिजे ,महाविद्यालयाने या प्रमाणे कार्यवाही केलेली नाही, उक्त नियमानुसार कार्यवाही करुन पुर्तता लेखा परिक्षणास सादर करावी.

महाविद्यालयाने लेखा परिक्षणाचे अनूपालन खालील नमून्यात अहवाल मिळाले पासून १ महिन्याचे आत सादर करावे.

| अ. क्र | परि. क्र. परीच्छेदाचा सारांश | महाविद्यालयाने दिलेले अनुपालन | व. ले. प. यांचा अभिप्राय |
|---|---|---|---|
| | | | |

:: सारांश ::

१. महाविद्यालय स्तरावर शिल्लक वेतन अनुदान :- रु ३०१४०१८/- ( परि क्र १ )
२.वेतन अनुदान अमान्य रुपये :- रु. शेनकुडे बी. एस. यांचे वेतन (परिच्छेद क्र. १३ )
३.वेतनेत्तर अनुदान अमान्य :- रु. ९९८२०२/- ( परि क्र ६ व १४ )
४.वेतनेत्तर अनुदान आक्षेपाधीन :- रु. १२०८२८३ /- ( परि क्र. ५,४,८ )

वरील प्रमाणे अमान्य रक्कम सहसंचालक, उच्च शिक्षण, औरंगाबाद यांनी पुढील अनुदानातून कपात करुन लेखा परिक्षणास पुर्तता दर्शवावी.

वरीष्ठ लेखा परीक्षक तथा लेखाधिकारीउच्च
शिक्षण अनुदान,औरंगाबाद विभाग,
औरंगाबाद.

Principal
Kalikadevi Arts, Comm. & Sci. College,
Shirur (Ka.), Dist. Beed.